# कार्यक्रमाची माहिती

## कथाकथन

**भाषेची ऐशीतैशी**: मराठी माणूस त्यातही मराठी गृहीणी कुठेही गेली तरी सहज सामावून जाते. त्यासाठी फक्त मराठीच येत असलं तरी अडत नाही. चला तर अशाच एका गृहिणीबरोबर आपणही चाखूया उत्तरेतलं पाणी ....

**माणसांची भाषा**: भाषा वाटते तितकी नक्कीच सोपी नाही. त्यातून ती माशांना शिकवायची झाली तर...?

**माझं अध्यक्षपद**: एक लेखिका म्हणून लाभलेलं, निभावलेलं अध्यक्ष पद. या अध्यक्षपदाची सुरस कथा ऐकण्याची गम्मत काही औरच.



*मोहना जोगळेकर : भारतात कथाकथनाचे १५० हून अधिक कार्येक्रम तर अमेरिकेतील महाराष्ट्र मंडळां मधून गेल्या काही वर्षात "मेल्टिंग पॉट" या कथा संग्रहाच्या निमित्ताने सातत्याने कथाकथन.*



## *Stand-up Comedy*

अमेरिकेतल्या युवावर्गाला आणि त्यांच्या पालकांना आपलासा वाटणारा कार्यक्रमाचा उच्चबिंदू आहे **ऋत्विक जोगळेकर**ची "Stand-up Comedy!". खदखदून हसायला लावणारं आजी, आजोबा आणि नातवाचं अमेरिका दर्शन, "**माय मदर्स टंग इज मराठी...**"

## *मेल्टिंग पॉट (किंमत $५)*




कोकण मराठी साहित्य परिषदेचा कथासंग्रहासाठी प्रथम पुरस्कार प्राप्त "मेल्टिंग पॉट"! कथासंग्रहाला पद्मश्री श्री. मधुमंगेश कर्णिक ह्यांची प्रस्तावना लाभली आहे. सकाळ, लोकसत्ता, पुढारी, रत्नागिरी टाईम्स, महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रांतून 'मेल्टिंग पॉट' कथासंग्रहाची परिक्षणे प्रसिद्ध.

अमेरिकन भारतीयांच्या जीवनावर आधारित काही वास्तववादी कथांबरोबरच नातेसंबधातील वीण, तिढा, प्रेम, जवळीक या साऱ्या भावनांचा गोफ म्हणजेच हा कथासंग्रह. उल्लंघन मधील दोन मित्रांची विलक्षण हकीकत, ऑमिष समाजातील घडलेली प्रेमकथा, सावत्र मुलासाठी धडपडणारा पिता, अशिक्षित नीनाने सैनिकांच्या पाशवी पणाला केलेला कडवा प्रतिकार, दोन तरुण मुलं गमावल्यावर शाळकरी मुलांमधे बाल्य शोधू पाहणारी सुमित्रा, अशा नानाविध विषयानी सजलेला हा कथासंग्रह संग्रही हवाच!

अधिक माहिती साठी संकेतस्थळ:
http://home.nc.rr.com/mvrj/journalist/mp_main.html